# महाराष्ट्र विधानसभा

## पहिले अधिवेशन, २०१६

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

**कात्रज कोंढवा बायपास रस्त्याचे रुंदीकरण व मजबूतीकरणाबाबत**

**(१) ११६३ (२२-१२-२०१४). श्री.योगेश टिळेकर (हडपसर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कात्रज कोंढवा बायपास रस्त्याचे रुंदीकरण व मजबूतीकरण व्हावे याबाबतची मागणी नागरिकांकडून गेल्या अनेक वर्षापासून प्रलंबित, आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पुणे महानगरपालिकेने या रस्त्याचे रुंदीकरण व मजबूतीकरण व्हावे प्रस्ताव तयार करुनही अजून पर्यत हे काम प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने यावर काय उपाययोजना केली आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१०-०८-२०१५) :** (१) होय. कात्रज कोंढवा रस्त्याचे रुंदीकरण करणेकरीता मागणी होत आहे.

(२) होय.

(३) व (४) सदर रस्त्याच्या कामासाठी सन २०१४-१५ च्या अंदाजपत्रकात तरतूद उपलब्ध नसल्याने सदर रस्त्याचे पुर्वगणनपत्रक तयार करुन डिफर्ड पेमेंट पध्दतीने निविदा मागविण्यात आलेल्या होत्या. परंतु अवाजवी दराच्या निविदा आल्यामुळे निविदा रद्द करण्यात आलेल्या आहेत.

---

**धुळे व अनेक जिल्हयात मुलांचे मिडब्रेन ॲक्टिव्हेट करण्याच्या खोट्या जाहिराती रोखण्याबाबत**

**(२) ५८६८ (०७-०४-२०१५). श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धुळयासह अनेक जिल्हयात गेल्या काही महिन्यापासून मुलांचे मिडब्रेन ॲक्टिव्हेट करुन त्यांचा बुध्दयांक व स्मरणशक्ती वाढवितो तसेच स्पर्श किंवा वासाने वस्तू ओळखता येतील अशा प्रकाराच्या जाहिरातीव्दारे मुलांची व पालकांची फसवणूक होत असल्याचे माहे जानेवारी, २०१५ दरम्यान आढळून आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अशा प्रकाराच्या खोट्या जाहिरातीना रोखण्यासाठी शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०९-०९-२०१५) :**(१) अशा प्रकारची तक्रार/गुन्हा धुळे जिल्ह्यात दाखल नाही

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नवी मुंबई विमानतळाच्या बांधणीसाठी नदयांची पात्रे बदलण्यात आल्याने आसपासच्या गावांना निर्माण होणारा पुराचा धोका**

**(३) ६४३६ (०६-०४-२०१५). श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.सुभाष साबणे (देगलूर), श्री.अशोक पाटील (भांडूप पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबई विमानतळाच्या बांधणीसाठी नदयांची पात्रे बदलण्यात आल्याने आसपासच्या गावांना पुराचा धोका निर्माण होईल अशी शक्यता असल्याबाबत पर्यावरण विषयक संघटनेने माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान न्यायालयात याचिका दाखल केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ज्या गावांना नदयांची पात्रे बदल्यामुळे पुरांचा धोका निर्माण होणार आहे याकरिता शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहेत,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२१-०८-२०१५) :** (१) व (२) होय. सेव मॅग्रोज व नवी मुंबई एग्झास्टन्स् यांच्यावतीने मा.उच्च न्यायालयासमोर याचिका दाखल केली आहे. कैंद्रिय जल आणि विद्युत संशोधन केंद्र, पुणे यांचेमार्फत सखोल अभ्यास सुरु आहे. तसेच पूरविषय समितीची स्थपना करण्यात आली आहे. सदर अहवालानुसार कार्यवाही करण्यात येणार आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबई भांडूप (प) येथील वाहतुकीस अडथळा निर्माण होणा-या रस्त्यांचे रुंदीकरण करण्याबाबत**

**(४) ६५२४ (१०-०४-२०१५). श्री.अशोक पाटील (भांडूप पश्चिम), श्री.तुकाराम काते (अणुशक्ती नगर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई भांडूप (प) येथील वाहतुकीस अडथळा निर्माण होणाऱ्या ठिकाणी रस्ता रुंदीकरणाबाबत दिनांक २८ ऑक्टोबर, २०१४ रोजी निवेदन अतिरिक्त आयुक्त, पुर्व उपनगरे मुंबई यांना दिले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार वाहतुकीस अडथळा निर्माण होणाऱ्या ठिकाणी रस्ता रुंदीकरण लवकरात लवकर करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०४-०८-२०१५) :** (१) हे खरे आहे.

(२) भांडुप (प.) येथील लाल बहादुर शास्त्री मार्ग या ३०.५० मीटर रुंद मंजूर सीमारेषा असलेल्या रुंदीकरण अग्रक्रमाने हाती घेण्यात येत आहे. सदर रस्त्याचे संपूर्ण स्थापनक सर्वेक्षंण व निवासी गाळेधारक २३, अनिवासी६०२ व धार्मिक गाळेधारक १ अशा एकूण ६२६ बाधीत गाळेधारकांच्या यादीचे काम पूर्ण झाले असून सदर बांधकामांना एम.आर.टी.पी. अधिनियम ५६ अन्वये नोटीसी बजावण्यात आल्या होत्या. सदर नोटीस देताना सर्व गाळेधारकांना रेडी रेकनरनुसार रक्कम देण्याचे व त्यानुसार रस्त रुंदीकरण करण्याचे प्रस्ताविले होते. परंतु सदर प्रस्तावास गाळेधारकांची संख्या जास्त असल्याने त्यांना देण्यात येणाऱ्या पर्यायी अनिवासी गाळ्यांची उपलब्धता सद्य:स्थिती महानगरपालिकेकडे नसल्याने लाल बहादूर शास्त्री मार्गाच्या रस्ता रुंदीकरणाचे काम टप्प्याटप्प्याने करण्याचे ठरविण्यात आले असून त्यानुसार प्रथम टप्प्यात लाल बहादूर शास्त्री मार्गावरील एम.व्ही. आर.शिंदे मार्ग ते भांडुप स्टेशन मार्ग या टप्प्यांचे काम हाती घेण्यात आले आहे. सदर टप्प्यातील गाळेधारकांना पत्र / नोटीस बजावून त्यांचेकडून कागदपत्रे मागविण्यात आली त्यानुसार सदर टप्प्यात एकूण ४४ व्यावसायिक बांधकाम बाधित असून यापैकी २२ बांधकामे पूर्णपणे तर २२ बांधकामे अंशत: बाधित आहे. सदर गाळेधारकांकडून पात्रतेबाबतची कागदपत्रे प्राप्त झालेली असून सदर कागदपत्रांच्या पडताळणी पश्चात पात्र अंशत: बाधित गाळेधारकांना मार्गरेषेपलिकडे उर्वरित जागेत करार पॅटर्ननुसार स्थलांतरीत करण्याबाबतची कार्यवाही करण्यात येईल व पूर्णत: बाधीत गाळेधारकांना पर्यायी अनिवासी गाळे देण्याकरिता बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत कार्यवाही केली जाईल.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कल्याण महानगरपालिका हद्दीतील चक्कीनाका ते हाजीमलंग रस्त्यावर कॉक्रीटचे काम अत्यंत संथ गतीने सुरु असल्याबाबत.**

**(५) ६६६५ (०७-०४-२०१५). श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.किसन कथोरे (मुरबाड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण महानगरपालिका हद्दीतील चक्कीनाका ते हाजीमलंग रस्त्यावर कॉक्रीटचे काम अत्यंत संथ गतीने होत असल्याने पादचारी व वाहन धारकांची गैरसोय होत आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या कामाच्या विकासकास किती मुदतीमध्ये काम करण्याचे आदेश देण्यात आले आहेत,

(३) असल्यास, नागरीकांना गैरसोई होत असल्यामुळे विकासकावर कोणत्या प्रकारची कारवाई करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१७-०८-२०१५) :** (१) अंशतः खरे आहे.

(२) सदर कामाच्या अभिकरणास दि.१७/११/२०१२ ते दि.१६/०२/२०१४ या १५ महिन्याच्या कालावधीमध्ये काम पूर्ण करण्यासाठी कार्यादेश देण्यात आला होता. परंतु, रस्ता रुंदीकरणासाठी आवश्यक भूसंपादन व इतर तांत्रिक अडचणीमुळे मुदतीत काम पूर्ण करणे शक्य झाले नसल्यामुळे महानगरपालिकेमार्फत संबंधित अभिकरणास दि. ३१/१२/२०१५ मुदतवाढ देण्यात आली आहे.

(३) सदर रस्त्याच्या बाधीत अतिक्रमणांवर कारवाई करुन तसेच वाहतूकीचे नियोजन वाहतूक शाखेच्या परवानगीनुसार करण्यात येत असल्यामुळे कामास विलंब होत आहे. कामात अपेक्षित प्रगती दाखविण्यासाठी संबंधित अभिकरणास वेळोवेळी नोटीस देण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कल्याण-डोंबिवली शहरातील महानगरपालिकेचा पाणी प्रश्न दिवसें दिवस गंभीर होत असल्याबाबत**

**(६) ६६८८ (०८-०३-२०१५). श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण-डोंबिवली शहरातील महानगरपालिकेने पाणी प्रश्न दिवसेंदिवस गंभीर होत असतांनाही महानगरपालिका प्रशासनाने भूजल साठ्याकडे विशेषतः शहरातील पुरातन विहिर व कुपनलिकांकडे दुर्लक्ष केले असून शहरातील ८५० बोअरवेल पैकी ५३४ बोअरवेल चालू असून ३०४ बोअरवेल बंद असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उन्हाळ्यात पाणी टंचाईची समस्या गंभीर होत चालली असून पुरातन विहिर व कुपनलिकांची देखभाल व दुरुस्ती करुन भुजल साठ्याचा योग्य उपयोग केल्यास

कल्याण-डोंबिवली शहरातील पाणी समस्या बऱ्याच प्रमाणात दूर होऊ शकते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार शासनाने कल्याण- डोंबिवली येथील पाणी प्रश्न सोडविण्याबाबत कोणती कायम स्वरुपी उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१७-०८-२०१५) :** (१) हे खरे नाही.

सद्य:स्थितीत ७२ बोअरवेल कायमस्वरुपी बंद असून उर्वरित बोअरवेलची निगा-दुरुस्ती करुन वापरात आहेत.

(२) होय.

कल्याण-डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रात असलेल्या विहिरींची व कुपनलिकांची वेळोवेळी देखभाल-दुरुस्ती केली जाते. सद्य:स्थितीत शहरात होणारा एकूण पाणी पुरवठा ३०० द.ल.लि. आहे. महानगरपालिका क्षेत्रातील विहिरी व कुपनलिका यांच्यामार्फत उपलब्ध होणाऱ्या पाण्यामुळे शहरातील पेयजलाव्यतिरिक्त वापरण्यात येणाऱ्या पाणी समस्येवर काही प्रमाणात मात होते.

(३) कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेसे वाढीव पाणी देणे शक्य व्हावे, यासाठी २ टी.एम.सी. पाणी साठा होईल इतपत बारवी धरणाचे काम प्राधान्याने पूर्ण करण्याबाबत मा.मंत्री जलसंपदा यांनी दि. ०७/०४/२०१५ रोजी झालेल्या बैठकीमध्ये महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळास निर्देश दिले आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## नवी मुंबई क्षेत्रात उचित ठिकाणी महापुरूषांची स्मारके उभी करण्यासाठी सिडकोकडून भूखंड उपलब्ध होण्याबाबत

**(७) ६८६१ (०८-०४-२०१५). श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) देशातील महापुरूषांनी केलेल्या महान कार्याची माहिती नवीन पिढीला व्हावी तसेच स्फूर्ती मिळावी यासाठी नवी मुंबई क्षेत्रात उचित ठिकाणी महापुरूषांची स्मारके उभारण्यासाठी सिडको महामंडळाकडून भूखंड उपलब्ध व्हावेत यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधींनी माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान व्यवस्थापकीय संचालक सिडको तसेच मा.मुख्यमंत्री महोदयांना निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने भूखंड उपलब्ध करून देण्याबाबत सिडको महामंडळ व शासनाकडून कोणती कार्यवाही करण्यात आली आहे वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२१-०८-२०१५) :** (१) व (२) होय, दिवंगत माजी खासदार दि.बा.पाटील यांचे स्मृती स्मारक जासई गावात उभारणे साठी निवेदन प्राप्त झाले आहे. त्याप्रमाणे हुतात्मा भवन बांधणे संबंधिची कार्यवाही सुरु आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## नवी मुंबईत प्रादेशिक चित्रपटासाठी चित्रपटगृह उभारण्याकरिता सिडकोकडून भुखंड मिळणेबाबत

**(८) ६८६२ (०७-०४-२०१५). श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नवी मुंबईतील मराठी भाषिक व रसिकांना मराठी चित्रपट पहाण्यासाठी स्वतंत्र चित्रपटगृह उपलब्ध नसल्याने मराठी चित्रपट रसिकांची अत्यंत गैरसोय होते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मराठी चित्रपटांसाठी स्वतंत्र चित्रपटगृह बांधण्यात यावे व त्यासाठी सिडकोने भूखंड उपलब्ध करुन द्यावा म्हणून स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री व मा. सांस्कृतिक मंत्री यांना माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यासुमारास निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२१-०८-२०१५) :** (१) नाही.
(२) होय.
(३) नवी मुंबई महानगरपालिका नियोजन प्राधिकरण झाल्यापासून सिडकोने आतापर्यंत सामाजिक सुविधा/पार्किंग/स्टॉल/मार्केट इ.साठी सुमारे २४४ भुखंड हस्तांतरीत केले असून उर्वरित भूखंड हस्तांतरीत करण्याची प्रक्रिया प्राधान्याने सुरु आहे. हस्तांतरीत भूखंडापैकी सुयोग्य भूखंड सिडकोच्या संमतीने नवी मुंबई महानगरपालिकेला आवश्यक त्या कारणासाठी वापरणे शक्य आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## उरण परिसरात सिडकोने संपादित केलेल्या हजारो एकर जमिनीवर अनधिकृतपणे झोपड्या बांधल्याबाबत

**(९) ६८८८ (०७-०४-२०१५). श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) उरण परिसरात सिडकोने संपादित केलेल्या हजारो एकर जमिनीवर रोजगारानिमित्त आलेल्या बांगलादेशी नागरिकांनी मोठ्या प्रमाणावर अनाधिकृतपणे झोपड्या बांधल्या आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या झोपड्यांमधून राहणाऱ्या बांगलादेशीय नागरिक तेथील गोदाम व इतर भागांमध्ये चोऱ्या व घरफोड्या करीत असल्यामुळे परिसरातील नागरिक त्रस्त झाले आहेत, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर अनाधिकृत झोपड्या हटविण्याबाबत कोणती कार्यवाही करण्यात आली आहे वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२१-०८-२०१५) :** (१), (२) व (३) उरण परिसरातील सिडकोच्या अखत्यारीत असलेल्या मोकळ्या भूखंडावरील अनधिकृत कच्च्या स्वरुपाच्या झोपड्यांवर निष्कासनाची कारवाई सिडको अतिक्रमण विभागामार्फत वेळोवेळी पार पाडली जाते. सिडकोच्या काही मोकळ्या भूखंडांवर स्थलांतरीत मजूरांच्या तात्पूरत्या झोपड्या निदर्शनास आल्यावर त्या झोपड्या हटविण्याची कारवाई वेळोवेळी पोलीस बंदोबस्ताच्या उपलब्धतेनुसार केली जाते.

निष्कासनाची कारवाई पूर्ण झाल्यावर त्या ठिकाणी पुन्हा झोपड्या उभ्या राहून नयेत याकरिता झोपडी धारकांचे जप्त करण्याजोगे झोपडीचे सामान जप्त करण्यात येते तसेच अशा रिक्त झालेल्या भूखंडावर पुन्हा अतिक्रमणे होऊ नये म्हणून संरक्षक तारेचे कुंपन घालून सिडकोचा फलक लावण्यात येतो.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नवीन पनवेल शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी शिवा कॉम्प्लेक्स येथे ३० वर्षापूर्वी सिडकोने बांधलेला बस डेपोत सध्या मोकाट कुत्री आणि गुरांचा कोंडवाडा झाल्याबाबत**

**(१०) ७१७१ (०८-०४-२०१५). श्री.मनोहर भोईर (उरण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवीन पनवेल शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी शिवा कॉम्प्लेक्स येथे ३० वर्षापूर्वी सिडकोने बांधलेला बस डेपोत सध्या मोकाट कुत्री आणि गुरांचा कोंडवाडा झाल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या बस डेपो संदर्भात तेथील नागरिकांनी वारंवार सिडको प्रशासनाकडे तक्रार करुनही कोणतीच कार्यवाही करण्यात आलेली नाही, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, या संदर्भात शासनाने आता कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२१-०८-२०१५) :**(१) व (२) हे खरे नाही. तथापि, याबाबत नमूद करण्यात येते की, सेक्टर १२, नवीन पनवेल येथील भूखंड क्र. १९ हा भूखाड बस टर्मिनसकरीता राखीव ठेवण्यात आला असून, नियोजीत आराखड्यानुसार बांधकाम झालेले आहे. सदर बस टर्मिनसचा वापर नवी मुंबई महानगरपालिका परिवहन व महाराष्ट्र परिवहन मंडळाकडून होत आहे.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**उरण आणि न्हावा-शेवा (जि.रायगड) परिसरात बांधण्यात येत असलेल्या कंटेनर बर्थमुळे तिवरांचे जंगल झपाट्याने नष्ट होत असल्याबाबत.**

**(११) ७३७८ (०७-०४-२०१५). श्री.अजय चौधरी (शिवडी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उरण आणि न्हावा - शेवा (जि.रायगड) परिसरात बांधण्यात येत असलेल्या कंटेनर बर्थमुळे पाणस्थळ जागेवर भरणी करण्याचे काम अविरत सुरु असून या भागातील सुमारे ४०० हेक्टर पाणस्थळ जमीन आणि त्या जमिनीवरील तिवरांचे जंगल झपाट्याने तोड होत असल्याचे माहे डिसेंबर, २०१४ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राष्ट्रीय हरित लवादाने पाणस्थळ जागेवर भराव टाकण्यास स्थगिती दिली असतांनाही राजरोसपणे याठिकाणी भराव टाकण्याचे काम सिडकोमार्फत केली जात आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच खोपटा आणि मुलेकान खाडीच्या मुखावर घालण्यात येत असलेल्या बंधाऱ्यामुळे तिवरांच्या जंगलाना मिळणारी पाण्याची रसद तुटून तिवरे पाण्याअभावी सुकू लागती आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,

(५) तद्नुसार यास जबाबदार असणाऱ्या अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२१-०८-२०१५) :** (१) व (२) उरण आणि न्हावा-शेवा (जि.रायगड) परिसरात सिडकोतर्फे कोणत्याही प्रकारचे कंटेनर बर्थचे बांधकाम हाती घेण्यात आलेले नाही.

(३), (४) व (५) खोपटा आणि मुलेकान खाडीच्या मुखावर बंधारे घालण्याचे कोणत्याही प्रकारचे काम सिडकोतर्फे हाती घेण्यात आलेले नाही. परंतु सिडकोने द्रोणागिरी धारण तलाव क्र.२ च्या पाईप निकास मार्गाच्या पुनर्बांधणीचे काम आवश्यक त्या सर्व परवानग्या घेऊन माहे ऑक्टोबर, २०१४ मध्ये काम पूर्ण केले आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**जालना जिल्हयातील गोंदी पोलीस स्टेशन अंतर्गत जुगार मटका रेशन रॉकेलचा काळा बाजार सुरू असल्याबाबत**

**(१२) ७७९९ (०६-०४-२०१५). श्री.अर्जुन खोतकर (जालना) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जालना जिल्हयातील गोंदी पोलीस स्टेशन अंतर्गत जुगार मटका, रेशन रॉकेलचा काळा बाजार सुरू असून गुन्हेगारीमध्ये वाढ झाल्यामुळे पोलीस निरीक्षक श्री.अशोक घोरबांड यांच्या विरोधात कारवाई करण्यासाठी शहागड व्यापारी महासंघाने बंद व रास्ता रोको माहे ऑक्टोबर, २०१४ मध्ये केला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू प्रकरणी वाळू माफिया व अवैध धंदेवाले, पुढारी पाठीशी घालत असल्याची तक्रार करण्यात आली होती, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी कोणती कारवाई करण्यात आली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०३-०९-२०१५) :** (१) हे खरे नाही,

माहे ऑक्टोबर, २०१४ मध्ये वा त्या सुमारास शहागड व्यापारी महासंघाने बंद व रास्ता रोको आंदोलन केलेले नाही,
(२) व (३) हे खरे नाही,

पोलीस ठाणे गोंदी हद्दीमध्ये अवैध धंदे करणारे लोकांची गोपनिय माहिती काढून त्यांचेवर वेळोवेळी कार्यवाही केलेली आहे,
(४) विलंब झालेला नाही.

---

**नवी मुंबई (जि.ठाणे) सिडको हद्दीतील सहकारी संस्थांचे व्यवस्थापन करण्याकरीता सहनिबंधक सहकारी संस्था सिडको हे पद निर्माण करण्याबाबत**

**(१३) ८१७६ (०९-०४-२०१५). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल) श्री.राजपुरोहित (कुलाबा), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नवी मुंबई (जि.ठाणे) सिडको हद्दीतील सहकारी संस्थांचे व्यवस्थापन करण्याकरीता सहनिबंधक सहकारी संस्था सिडको हे पद निर्माण करुन त्यांचे कार्यालय रायगड भवन येथे मागील १७ वर्षापूर्वी सुरु केले असून हे कार्यालय सहकारी संस्था अधिनियम १९६० व नियम १९६१ व त्या अनुषंगाने वेळोवेळी सहकार खाते जी परिपत्रके व आदेश देत असते त्यानुसार चालत असते, हे खरे आहे काय,
(२) या कार्यालयात सहनिबंधक दर्जाचा अधिकारी सोडता इतर कर्मचारी हे सिडकोचे असल्याने त्यांना म.स.सं. अधिनियम १९६० व नियम १९६७ व पुरेसे ज्ञान नसल्याने सदर कार्यालयातील कामकाज संथगतीने चालत असल्याचे माहे जानेवारी, २०१५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर कार्यालयातील सहनिबंधक हे दिनांक १९ सप्टेंबर, २०१४ पासून गैरहजर असल्याने व कर्मचाऱ्यांना पुरेसे ज्ञान नसल्याने नवी मुंबई सिडको हद्दीतील सहकारी गृहनिर्माण संस्थाच्या अनेक कामे प्रलंबित आहेत तसेच ९७ व्या घटना दुरुस्तीनुसार घ्यावयाच्या संचालक मंडळाच्या निवडणूकासुध्दा प्रलंबित राहिल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार तेथील प्रलंबित कामे लवकरात लवकर पूर्ण होण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२१-०९-२०१५) :** (१) होय.

(२) नाही.

(३), (४) व (५) दि.१९.९.३२०१४ ते दि.१५.२.२०१५ या कालावधीत सहनिबंधक, सहकारी संस्था सिडको हे वैद्यकीय रजेवर होते. या कालावधीत जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था (२) पूर्व उपनगरे, मुंबई यांचेकडे वरील पदाचा अतिरिक्त पदभार देण्यात आला होता, त्यामुळे निवडणूका प्रलंबित नाहीत.

सहनिबंधक सहकारी संस्था सिडको यांचे कार्यालयात सहकार विभागाकडील ६ अधिकारी/कर्मचारी प्रतिनियुक्तीवर घेण्यासाठी व सिडकोकडील १० कर्मचारी देण्याबाबत आकृतीबंध मंजूरीसाठी सादर केलेला आहे.

---

**कळंबोली (ता.पनवेल, जि. रायगड) येथे सिडकोने ३० वर्षापूर्वी बांधलेल्या सदनिका निकृष्ट दर्जाच्या असल्याबाबत**

**(१४) ८१७८ (०६-०४-२०१५). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.राज पुरोहित (कुलाबा), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कळंबोली (ता.पनवेल, जि. रायगड) येथे सिडकोने ३० वर्षापूर्वी बांधलेल्या सदनिका निकृष्ट दर्जाच्या असून इमारतीमधील वारंवार स्लॅब, बिम, प्लास्टर कोसळणे, पावसाळ्यात मोठयाप्रमाणत पाणी झिरपणे यामुळे रहिवाश्यांच्या जीवाला धोका निर्माण झाला असल्याचे माहे जानेवारी २०१५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सिडकोचे व्यवस्थापकीय संचालक यांनी सदर सदनिका नागरिकांना राहण्यास धोकादायक असून सदनिका पूनर्बांधणीची अधिसुचनाही काढली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त सदनिका पुनर्बांधणीसाठी शासन कोणती आवश्यक ती कार्यवाही करणार वा करीत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२१-०८-२०१५) :** (१), (२) व (३) सदर सदनिकांचे मे, २०१३ मध्ये स्ट्रक्चरल ऑडिट केल्यानंतर ९७ सदनिका धोकादायक असल्याचे निदर्शनास आल्याने सिडकोच्या सर्वसाधारण विकास नियंत्रण नियमावलीत नवीन विनियम अंतर्भूत करुन सुधारित अधिसूचना प्रसिध्द करण्यात आली आहे. त्यानुसार पुढील कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**खारघर (ता.पनवेल, जि.रायगड) येथील लोकसंख्या तीन लाखांहून अधिक असून एवढ्या नागरिकांच्या आरोग्यासाठी सिडकोने केवळ सहा कर्मचारी हंगामी तत्वावर ठेवल्याबाबत**

**(१५) ८१८३ (०७-०४-२०१५). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.राज पुरोहित (कुलाबा), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खारघर (ता.पनवेल, जि.रायगड) येथील लोकसंख्या तीन लाखांहून अधिक असून एवढ्या नागरिकांच्या आरोग्यासाठी सिडकोने केवळ सहा कर्मचारी हंगामी तत्वावर ठेवले असून वर्गवारी केल्यास ४१ हजारांमागे एक कर्मचारी अशी स्थिती असल्याचे माहे जानेवारी २०१५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त कर्मचाऱ्यांना मलेरिया निर्मुलनाच्या सर्वेक्षणासाठी उक्त हंगामी कर्मचाऱ्यांना नेमले असून त्यांना काम करण्यास अनेक समस्यांना तोंड द्यावे लागत आहे हे पाहता शासन त्वरीत आवश्यक ती कार्यवाही करणार वा करीत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२१-०८-२०१५) :** (१) व (२) खारघर, ता.पनवेल येथील लोकसंख्या २,०६,७३३ इतकी असून सदर लोकसंख्येच्या आरोग्यासाठी १४८ कर्मचारी कार्यरत आहेत. सदर कर्मचाऱ्यांमार्फत योग्य प्रकारे मलेरिया निर्मुलनाचे काम करण्यात येत आहे व त्या कर्मचाऱ्यांना मलेरिया निर्मुलनाचे सर्वेक्षण व इतर कामाकरिता समस्यांना तोंड द्यावे लागत असल्याची तक्रार प्राप्त नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**वरूड, (जि.अमरावती) येथील तत्कालीन पोलीस निरीक्षक, यांचेविरूध्द प्रलंबित असलेल्या चौकशीबाबत**

**(१६) ८५०२ (०६-०७-२०१५). श्री. आकाश फुंडकर (खामगांव) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) श्री.चंदु रामदास इंगळे, रा.वरूड, जि.अमरावती यांनी श्री.दिलीप पाटील, तत्कालीन पोलीस निरीक्षक, वरूड यांनी केलेल्या अत्याचाराविरूध्द दिनांक ६ फेब्रुवारी, २०१३ रोजी मा.प्रथम श्रेणी, न्यायदंडाधिकारी यांच्याकडे सदर प्रकरणी फौजदारी प्रक्रिया संहिता १९६३ चे कलम १५६/३ अंतर्गत चौकशी करण्यासाठी अर्ज दाखल केला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर अर्जांवर मा.प्रथम श्रेणी न्यायदंडाधिकारी यांनी दिनांक ४ डिसेंबर, २०१३ रोजी आदेश पारीत करून श्री.दिलीप पाटील व इतर यांचेविरूध्द फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम १५६/३ नुसार.भा.दं.सं.कलम २९४,३२३,२८४,५०६ (२) सह कलम ३४ आणि अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती (अत्याचारास प्रतिबंध) अधिनियम १९८९ चे कलम ३ (१) (१०)

प ३ (२) (७) या गुन्ह्याकरिता एफ.आय.आर.नोंदवून सक्षम अधिका-यामार्फत चौकशी करण्याचे आदेश देण्यात आले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, श्री.दिलीप पाटील व इतर आरोपी यांची मा.न्यायालयाच्या आदेशानुसार उच्चस्तरीय चौकशी करण्याबाबत ॲड.आकाश पांडुरंग फुंडकर, वि.स.स. यांनी मा.गृह राज्यमंत्री (शहरे) यांचेकडे डिसेंबर, २०१४ मध्ये पत्राद्वारे मागणी केली होती, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, अद्यापपर्यंत दलितांवर अन्याय करणा-या तसेच भ्रष्टाचार करणा-या श्री.दिलीप पाटील यांची चौकशी न करण्याची कारणे काय,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०७-०९-२०१५) :** (१) होय.

(२) होय.

(३) मा.विधानसभा सदस्य यांनी दिनांक १२.१२.२०१४ रोजी आरोपी यांची या प्रकरणाबाबत उच्चस्तरीय चौकशी करण्याबाबत मा.विशेष पोलीस महानिरीक्षक, अमरावती यांना केलेले निवेदन प्राप्त झाले आहे.

(४) आरोपी विरुध्द पो.स्टे, वरुड येथे एम.केस.अप.न.२११/१३, कलम २९४, ३२३, ३८४, ५०६(२) भादवि, सहकलम ३(१) (१०), ३(२)(७) अ.जा.ज.अ.प्र.का. प्रमाणे दिनांक ०५.१२.२०१३ रोजी गुन्हा दाखल केला असून, गुन्ह्यात न्यायालयाच्या आदेशाने दिनांक २७.०५.२०१४ रोजी ब समरी मंजूर केलेली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबईतील महापालिकेच्या पुलांचा सद्यस्थितीचा डाटा जमा करण्यासाठी महापालिकेने मिशन ब्रिज हाती घेतले असल्याबाबत

**(१७) ८७८८ (०६-०४-२०१५). श्री.मंगलप्रभात लोढा (मलबार हिल), श्री.तुकाराम काते (अणुशक्ती नगर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील महापालिकेच्या पुलांचा सद्यस्थितीचा डाटा जमा करण्यासाठी महापालिकेने मिशन ब्रिज हाती घेतले असून मुंबईतील २७० पुलांची पाहणी करुन सर्वेक्षण करण्यात येणार आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबईतील किती पुलांचे आतापर्यंत सर्वेक्षण पुर्ण झाले आहे,

(३) असल्यास, या कामाकरीता निविदा काढल्या आहेत काय,

(४) असल्यास, सदर काम कोणत्या कंपनीला देण्यात येणार आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१७-०८-२०१५) :** (१) मुंबईतील २७४ पुलाचे सर्वेक्षण करुन आवश्यकतेनुसार त्यांची दुरुती किंवा पुनर्बाधणी करण्याबाबत उपाययोजना तयार करण्याचे काम बृहन्मुंबई महानगरपालिकेने हाती घेतले आहे.

(२) बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत निविदा प्रक्रिया सुरु असल्याने सर्वेक्षणाचे काम सुरु

करण्यात आलेले नाही.
(३) निविदा प्रक्रिया सुरु असून आतापर्यंत एकूण ९ निविदा बृहन्मुंबई महानगरपालिकेस प्राप्त झालेल्या आहेत.
(४) निविदा प्रक्रिया पूर्ण न झाल्यामुळे संस्था निश्चित करण्यात आलेली नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मुंबईतील नरिमन पॉईंट, वांद्रे-कुर्ला संकुल, लोअर परळ व अंधेरी येथे नवीन बिझनेस झोन तयार करण्याबाबत**

**(१८) १०३१५ (०७-०४-२०१५). श्री.अजित पवार (बारामती), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.राहुल मोटे (परांडा), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.दिलीप सोपल (बार्शी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील नरिमन पॉईंट, वांद्रे-कुर्ला संकुल, लोअर परळ व अंधेरी येथे नवीन बिझनेस झोन तयार करण्याचा मुंबई महानगरपालिकेने निर्णय घेतल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या योजनेचे थोडक्यात स्वरुप काय आहे,
(३) ही योजना प्रत्यक्षात केव्हा अंमलात आणण्यात येणार आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१६-११-२०१५) :** (१) हे खरे नाही.
(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**जळगांव जिल्ह्यातील एनडीबीबी संचलित दुध संघात दूध चोरीची घटना घडल्याबाबत**

**(१९) ११२८५ (०४-०४-२०१५). श्री.चंद्रकांत सोनावणे (चोपडा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जळगांव जिल्ह्यातील एनडीबीबी संचलित दुध संघात माहे जानेवारी, २०१५ मधील दूध चोरीची घटना निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत संबंधित ट्रान्सपोर्ट कंपनी व अधिकाऱ्यांचे विरुध्द कोणती कारवाई करण्यात आली आहे वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०९-०८-२०१५) :** (१) होय.

नमूद प्रकरणी दि.१३/१२/२०१४ रोजी जळगांव शहर पोलीस स्टेशन येथे गु.र.नं. १८८/१४, भा.दं.वि. कलम ३७९, ५११, ३४ नुसार गुन्हा दाखल आहे.

(२) नमूद प्रकरणात चोरी करणा-या संबंधित ट्रान्सपोर्ट कंपनी व अधिकारी असे एकूण ८ आरोपींना अटक करण्यात आली असून त्यांचेविरुध्द ३१/०१/२०१५ रोजी न्यायलयात दोषारोप दाखल करण्यात आलेले आहे. सद्य:स्थित प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.

(३) विलंब झालेला नाही.

---

**कल्याण रेल्वे स्थानकालगत पूर्व ते पश्चिम, तहसीलदार कार्यालय ते विक्रीकर कार्यालय, दुय्यम निबंधक कार्यालयापर्यंतचे स्कायवॉकचे काम निकृष्ट दर्जाचे झाल्याबाबत**

**(२०) १२०२३ (०७०४-२०१५). श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण रेल्वे स्थानकालगत पूर्व ते पश्चिम, तहसीलदार कार्यालय ते विक्रीकर कार्यालय, दुय्यम निबंधक कार्यालयापर्यंतचे स्कायवॉकच्या कामावर अनुक्रमे ३२ कोटी व ३५ कोटी एवढा खर्च झाला असून सदर बांधकाम निकृष्ट दर्जाचे करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, स्कायवॉकवर अनधिकृतपणे मोठ्या प्रमाणावर फेरीवाले व्यवसाय करीत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच स्कायवॉकची उंची जास्त असल्यामुळे या स्कायवॉकवर चढण्याकरिता नागरिकांना त्रास सहन करावा लागत असल्याने सरकते जिने बसविण्यात येणार आहेत काय,

(४) स्कायवॉकवर अनधिकृतपणे मोठ्या प्रमाणावर व्यवसाय करणाऱ्या फेरीवाल्यांना हटविण्याबाबत काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१७-०९-२०१५) :** (१) नाही.

(२) हे खरे नाही.

महानगरपालिकेमार्फत फेरीवाल्याविरुध्द वेळोवेळी कार्यवाही करुन गर्दीच्या वेळी स्कायवॉक फेरीवालामुक्त ठेवणेबाबत सकाळ व संध्याकाळच्या सत्रात कारवाई करण्यात येते.

(३) नाही.

(४) स्कायवॉकवरील अनधिकृत फेरीवाल्याविरुध्द महानगरपालिकेच्या फेरीवाला हटाव मोहिमेतील पथकांमार्फत सकाळ व संध्याकाळच्या सत्रात दैनंदिन प्रभावीपणे कारवाई करुन त्या ठिकाणी बसणारे सर्व फेरीवाले हटविले जात आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यभरातील पोलीस स्टेशन जीपीएस मॅपिंग करुन त्यांची माहिती मोबाईल ॲपवर उपलब्ध करण्याबाबत**

**(२१) १६१७७ (०८-०४-२०१५). श्री.लक्ष्मण जगताप (चिंचवड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यभरातील पोलीस स्टेशन जीपीएस मॅपिंग करुन त्यांची माहिती मोबाईल ॲपवर उपलब्ध करण्याची मा. उच्च न्यायालय मुंबई यांनी राज्य शासनाला सूचना केल्याचे माहे फेब्रुवारी, २०१५ मध्ये निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१९-०८-२०१५) :** (१) हे खरे आहे.

(२) महाराष्ट्र पोलीस दलाचे राज्यभरातील पोलीस स्टेशन जीपीएस मॅपिंग करुन माहिती मोबाईल ॲपवर उपलब्ध करण्याचे आदेश मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी दिलेले आहेत, इंटरनेट वापरकर्त्याच्या ठिकाणापासून कोणते पोलीस ठाणे जवळ व किती अंतर आहे, तसेच त्या पोलीस ठाण्यास जाण्यासाठी नेव्हीगेशनची माहिती मिळेल, सदर ॲपवर महाराष्ट्र राज्यातील सर्व पोलीस ठाणे येथील प्रमुख पोलीस अधिकारी यांची माहिती व त्यांचेसाठी संपर्क क्रमांक व ई-मेल आयडीची माहिती असेल,

कोणत्याही आपत्कालीन परिस्थितीमध्ये पोलीस नियंत्रण कक्षाशी संपर्क साधण्याची यंत्रणा उपलब्ध असेल, सदर ॲपवर जवळील पोलीस ठाणे हद्दीतील महत्वाचे हॉस्पीटल, रुग्णवाहीका, अग्निशमन दल यांची माहिती व संपर्क क्रमांक तात्काळ उपलब्ध होईल, सदर ॲपमुळे महिला, लहान बालक, वरिष्ठ नागरीक तसेच सामान्य नागरीकांच्या संबंधातील गुन्ह्यांना पायबंद घालण्यास मदत होईल, कायदा व सुव्यवस्था राखण्यात मोठया प्रकारे हातभार लागेल, सदर ॲप तयार करणेकामी कुशल मनुष्यबळ तसेच तांत्रिक सुविधेची गरज असल्यामुळे तसेच मनुष्यबळ महाराष्ट्र राज्य पोलीस दलाकडे उपलब्ध नसल्याने सदर मोबाईल ॲप तयार करुन देणेबाबतच्या दिनांक ३१ जुले, २०१५ च्या प्रस्तावावर शासन स्तरावर कार्यवाही सुरु आहे,

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील कनिष्ठ न्यायालयांमध्ये मुलभूत सुविधासाठीचा मंजूर निधी उपलब्ध न केल्याबाबत**

**(२२) १६३१७ (१२-०८-२०१५). श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील कनिष्ठ न्यायालयांमध्ये स्वच्छतागृहे आणि वाटॅर कुलरसारख्या मुलभूत सुविधांसाठी मा.उच्च न्यायालयाच्या निर्देशानंतर शासनाने निधी मंजूर करुनही तो प्रत्यक्षात वापराकरिता उपलब्ध करुन देण्यात न आल्यामुळे दिनांक १७ एप्रिल, २०१५ रोजी मा.उच्च न्यायालयाने शासनाप्रती नाराजी व्यक्त केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार कनिष्ठ न्यायालयांना निधी उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१५-०९-२०१५) :** (१) होय.
(२) हो, चौकशीमध्ये आढळून आले की, राज्यातील न्यायालयांमध्ये पुरेशी स्वच्छतागृहे बांधणे व जुनी दुरुस्त करणे यासाठी शासनाने रु.१३.६४ कोटीइतका निधी आकस्मिकता निधीतून प्रबंधक (निरिक्षणे-२), उच्च न्यायालय, मुंबई यांना उपलब्ध करुन दिला आहे. सदर निधी प्रबंधक, उच्च न्यायालय, मुंबई यांनी सार्वजनिक बांधकाम विभागाल हस्तांतरीत केला असून सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत बांधकामे प्रगतीपथावर आहेत.

तसेच, राज्यातील न्यायालयांना मा.उच्च न्यायालयाने मागणी केल्यानुसार पुरेसे वॉटर कुलर्स यांत्रांचा पुरवठा करण्यात आला आहे. वॉटर कुलर्स खरेदीची देयके अदा करण्यासाठी त्या त्या न्यायालयांच्या कार्यालयीन खर्चातून खर्च करण्यास प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे व सदर वॉटर कुलर यंत्रे बसविण्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाने निधी उपलबध करुन दिला असून सार्वजनिक बांधकाम विभाग सर्वोच्च प्राथम्याने वॉटर कुलर्स बसविण्यचे काम करीत आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## "बॉम्बे हायकोर्ट" चे "मुंबई हायकोर्ट" असे नामांतर करण्याबाबत

**(२३) १६४२४ (१२-०८-२०१५). डॉ.पतंगराव कदम (पलूस कडेगाव), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) “बॉम्बे हायकोर्ट” चे “मुंबई हायकोर्ट” असे नामांतर करण्याबाबत सर्वस्तरातून मागणी होत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यशासनाने या मागणीचे दखल घेऊन “बॉम्बे हायकोर्ट” चे “मुंबई हायकोर्ट” असे नामांतर करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२९-०८-२०१५) :** (१) होय, महाराष्ट्र शासनाने दिनांक १७ जानेवारी, २००५ रोजीच्या पत्रान्वये उच्च न्यायालय बॉम्बे याचे नामांतर करुन उच्च न्यायालय मुंबई करणेबाबत ना हरकत कळविले आहे,
(२) सचिव (न्याय), विधी व न्याय मंत्रालय, भारत सरकार यांनी दिनांक २७ ऑगस्ट, २०१२ रोजीच्या पत्रान्वये मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन यांना असे कळविले आहे की, कायद्याची योग्य प्रक्रिया पार पडल्यानंतर बॉम्बे, कलकत्ता आणि मद्रास येथील उच्च न्यायालयाचे

नामांतर करण्यासाठी त्यांच्या विभागाकडून एकत्रित वैधानिक प्रस्ताव मांडण्यात येईल. यासंदर्भात राज्य शासनाकडून पाठपुरावा करण्यात येत आहे. तथापि या प्रकरणी कार्यवाही केंद्र शासनाकडून प्रलंबित असल्याबाबतची माहिती केंद्र शासनाने दिनांक १ एप्रिल, २०१५ च्या पत्रान्वये कळविली आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील विदर्भ, मराठवाडा व खानदेश या मागास विभागात शासकीय पदे मोठ्या प्रमाणात रिक्त असल्याबाबत**

**(२४) १६५६२ (१०-०८-२०१५). श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), अ‍ॅड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.राहुल मोटे (परांडा), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.दिपक चव्हाण (फलटण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) विदर्भ, मराठवाडा, खान्देश या मागास असलेल्या विभागातील शासकीय पदे मोठ्या प्रमाणात रिक्त आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून निवड झालेल्या वर्ग एक आणि वर्ग दोनच्या शासकीय अधिकाऱ्यांची थेट विदर्भ, मराठवाडा, व खानदेशात नियुक्त्या करण्यात येणार असल्याचे माहे मे, २०१५ च्यासुमारास निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,
(३) तसेच, या नविन नियमावलीत वर्षभरानंतर अशा अधिकाऱ्यांना बदली करून घेण्यासाठी किमान एक वर्ष पूर्ण केल्यानंतर स्वत: किंवा पती, पत्नी त्यांची मुले, आई-वडील यांच्या आजारपणामुळे संवर्ग बदलीसाठी पळवाट आहे, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, ज्या विभागात नेमणूक होईल त्या विभागात वर्ग एकच्या अधिकाऱ्याला सहा वर्षे व वर्ग दोनच्या अधिकाऱ्याला नऊ वर्षे सेवेची सक्ती केली आहे काय,
(५) तसेच मुंबई, कोकण, पुणे आदि ठिकाणच्या आधिका-यांची पदे रिक्त राहू नये म्हणून शासनाने कोणती कार्यवाही केली करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०७-०९-२०१५) :** (१) व (२) नागपूर व अमरावती विभागातील जिल्ह्यात तसेच नंदूरबार, धुळे, परभणी, हिंगोली, बीड व उस्मानाबाद या जिल्ह्यात शासकीय अधिकारी व नविन नियुक्त अधिकारी रुजु होण्यास कमी प्रमाणात इच्छुक असल्याने सदर पदे अधिक प्रमाणात रिक्त राहत होती.

त्या अनुषंगानें महाराष्ट्र शासकीय गट-अ व गट-ब (राजपत्रित व अराजपत्रित) पदांवर सरळसेवेने व पदोन्नतीने नियुक्तीसाठी महसूली विभाग वाटप नियम, २०१५ दि.२८.०४.२०१५ व सुधारणा करुन दि. १६.०७.२०१५, अन्वये अधिसूचित करण्यात आले आहेत. सदर सुधारित नियमानुसार नागपूर, अमरावती, औरंगाबाद व नाशिक या महसूली विभागातील रिक्त पदे भरल्यानंतर उर्वरित अधिकाऱ्यांना कोकण विभाग व पुणे विभाग या क्रमाने विभाग वाटप करण्यात यावे. अशा सूचना देण्यात आल्या आहेत.
(३) शासकीय अधिकारी स्वत: किंवा यथास्थिती पती वा पत्नी वा त्यांची मुले वा त्यांच्यावर अवलंबून असणारी शासकीय अधिका-यांचे आई किंवा वडील यांचे विशिष्ट आजारांच्या परिस्थितीतच वाटप करण्यात आलेल्या विभागात किमान एक वर्ष सेवा पूर्ण केल्यानंतर विभाग बदलून मिळण्यासाठी अर्ज करण्याची मुभा सदर नियमावलीमध्ये देण्यात आली आहे.
(४) सरळसेवेने गट-अ संवर्गातील पदावर नियुक्त झालेल्या उमेदवारास त्याला वाटप करण्यात आलेल्या विभागात किमान ६ वर्षे व गट-ब संवर्गातील पदावर नियुक्त झालेल्या उमेदवारांस ९ वर्षे संबंधित महसूली विभागात सेवा कालावधी पूर्ण करणे आवश्यक आहे.
(५) व (६) दि. २८.०४.२०१५ व दि.१६.०७.२०१५ च्या अधिसूचनेव्दारे विहित केलेल्या नियमावलीनुसार नागपूर, अमरावती, औरंगाबाद व नाशिक या विभागातील रिक्त पदे भरल्यानंतर उर्वरित अधिकाऱ्यांना कोकण विभागात व पुणे विभाग या क्रमाने वाटप करण्यात यावे अशी तरतूद विहित करण्यात आली आहे.

---

**संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठातील गुणवाढ प्रकरणाबाबत**

**(२५) १६८२१ (१०-०८-२०१५). ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठात उघडीस आलेल्या गुणवाढ प्रकरणात संपुर्ण ७ लाख उत्तरपत्रिका तपासण्याचा निर्णय पोलिसांनी घेतला असल्याचे माहे एप्रिल, २०१५ दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाने येथील गुणवाढ प्रकरणाची चौकशी करुन संबंधितांवर काय कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०४-०९-२०१५) :** (१) अंशत: खरे आहे.
(२) सदर प्रकरणी परिक्षा नियंत्रक संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती यांनी दिलेल्या तक्रारीवरुन पोलीस स्टेशन फ्रेजपूरा येथे गु.र.क्र. १००/२०१५, भा.दं.वि. कलम ४६८,४७१,१०९,३४ अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे. सदर गुन्ह्यांच्या तपासात उत्तरपत्रिकेत गैरकायदेशीररित्या खाडाखोड करुन गुणवाढ केल्याचे निदर्शनास आल्यामुळे त्या उत्तरपत्रिका हस्ताक्षरतज्ञ कलिना, मुंबई येथे तपासणीसाठी पाठविण्यात आल्या आहेत.

सदर प्रकरणी ११ आरोपींना अटक करण्यात आली असून त्यांना न्यायालयाने जामीनावर सोडले आहे. विद्यापीठाने सदर गुन्ह्यांमधील खाडाखोड केलेल्या गुणपत्रिका संचालक, न्यायसहाय्यक वैज्ञानिक प्रयोगशाळा कलिना, मुंबई येथे पाठविण्यात आल्या असून त्यांचा अहवाल प्राप्त झालेला नाही. सदर अहवाल प्राप्त झाल्यानंतर त्या अनुषंगाने पुढील कार्यवाही करण्यात येईल.

सदर पुन्हा पोलीस तपासावर प्रलंबित आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील नद्या, नाले आणि ओढे यांच्या पात्रातील वाळू बेकायदा उपसणाऱ्या वाळूमाफीयांवर कारवाई करण्याबाबत**

**(२६) १६९५२ (०६-०८-२०१५). श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.सुरेश हाळवणकर (इचलकरंजी), श्री.प्रतापराव चिखलीकर (लोहा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील नद्या, नाले आणि ओढे यांच्या पात्रातील वाळू बेकायदा उपसणाऱ्या वाळूमाफीयांवर महाराष्ट्र प्रतिबंधात्मक विघातक कारवाया विरोधी कायद्यातंर्गत (एमपीडीए) कारवाई करणाच्या प्रस्तावाला विधी व न्याय विभागाने मान्यता दिली असल्याचे माहे मे, २०१५ च्या सुमारास निदर्शनास आले हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रस्तावावर निर्णय घेवून शासनाने आतापर्यंत राज्यात किती वाळूमाफीयांवर या कायद्यांतर्गत कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप, कारवाई केली नसल्यास होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०१-०९-२०१५) :** (१), (२) व (३) राज्यातील बेकायदा वाळू उपसाणा-या वाळू माफियांवर कारवाई करण्यासाठी, महाराष्ट्र झोपडपट्टी गुंड, हात भट्टीवाले, औषधिद्रव्ये विषयक गुन्हेगार, धोकादायक व्यक्ती व दृकश्राव्य कलाकृत्तीचे विनापरवाना प्रदेर्शन करणा-या व्यक्ती (व्हिडीओ पारयेटस) यांच्या विघातक कृत्यांना आळा घालण्याबाबत अधिनियम, १९८१ (एमपीडीए ॲक्ट-१९८१) च्या कक्षेत वाळू तस्करांना आणण्यासाठी सदर अधिनियमात सुधारणा करण्याची कार्यवाही विधी व न्याय विभागाच्या संमतीने सुरु आहे.

---

**गुन्हेशाखेतील अजनबी पोलीस कर्मचाऱ्यांचे रेतीचे चार ट्रक चालत असल्याबाबत**

**(२७) १६९९७ (०६.०८.२०१५). प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती जिल्ह्यातील गुन्हे शाखेतील अजनबी म्हणून प्रसिध्द असलेल्या पोलीस कर्मचाऱ्यांचे रेतीचे चार ट्रक चालत असल्याची बाब माहे मे, २०१५ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त अजनबीचे बिच्छु टेकडी परिसरात अवैध रेतीचे चार ट्रक असून हा सर्व व्यवहार त्यांचा लहान भाऊ पहात असुन संबंधितांना याबाबत माहिती असुनही कोणतीही कार्यवाही करण्यात येत नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०१-०९-२०१५) :** (१) नाही.
पोलीस कर्मचाऱ्याच्या भावाच्या नावावर २ ट्रक आहेत.
(२) व (३) सदर प्रकरणी पोलीसांनी चौकशी केली असता पोलीस कर्मचाऱ्यांच्या भावाचे २ ट्रक असून ते ट्रक बिल्डींग मटेरीयल सप्लायच्या कामावर वापरले जातात व रेती घाटावरुन वैधरित्या रेतीची वाहतूक केली जात असल्याचे निष्पन्न झाले आहे. त्यामुळे या प्रकरणी कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मुंबईतील इंदू मिल येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे स्मारक व्हावे म्हणून आंदोलन करणाऱ्या आंदोलकांवरील गुन्हे मागे घेण्याबाबत**

**(२८) १७५२५ (१०-०८-२०१५). श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), डॉ.पतंगराव कदम (पलूस कडेगाव), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील इंदू मिल येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे आंतरराष्ट्रीय दर्जाचे स्मारक व्हावे म्हणून आंदोलन करणाऱ्या आंदोलकांवरील सर्व गुन्हे मागे घेण्यात येतील असे मा.मुख्यमंत्री यांनी माहे एप्रिल, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान जाहिर केले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या आंदोलकांवरील खटले मागे घेण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०३-०९-२०१५) :** (१) असे जाहीर केलेले नाही. तथापि, राज्य शासनाने निर्गमित केलेल्या शासन निर्णय गृह विभाग दिनांक १३ जानेवारी, २०१५ अन्वये असणारे गुन्हे परत घेण्याचा राज्य शासनाचा मानस आहे.
(२) याबाबत सर्व माहिती संकलीत करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील सनदी अधिकाऱ्यांची पदे वाढविण्याबाबत**

**(२९) १८२४५ (१०-०८-२०१५). श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील नगरपरिषदांचे महापालिकांमध्ये झालेले रुपांतर, विविध मेट्रो प्रकल्प, विविध विकास प्राधिकरणे, कॉरीडॉर तसेच नवीन जिल्ह्यांची निर्मिती पाहता राज्यात सन १९९५ मध्ये सनदी अधिकाऱ्यांची ३८५ पदे असतांना दहा वर्षानंतर ही संख्या वाढणे अपेक्षित असतांना ही संख्या ३६१ असल्याचे माहे मे, २०१५ मध्ये निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन २०१४ मध्ये राज्यात ४४० सनदी अधिकाऱ्यांची पदे निश्चित करण्यासाठी राज्य शासनाने केंद्राकडे प्रस्ताव पाठविलेला होता, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर पदे वाढविण्यासाठी राज्य शासनामार्फत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे.

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०३-०९-२०१५) :** (१) राज्यातील भाप्रसे संवर्गाचे संख्याबळ सन १९८९ मध्ये ३५६, सन १९९२ मध्ये ३६६, सन १९९७ मध्ये ३५१ इतके होते, तद्नंतर दिनांक १० एप्रिल, २००७ च्या अधिसूचनेन्वये केंद्र शासनाने राज्यातील भाप्रसेचे एकूण संख्याबळ ३५० इतके मंजूर केले होते, आता, दिनांक १६ फेब्रुवारी, २०१५ रोजीच्या अधिसूचनेन्वये राज्याकरिता भाप्रसे संवर्गाचे एकूण संख्याबळ ३६१ इतके मंजूर करण्यात आले आहे,

(२) आणि (३) राज्य शासनाने दिनांक २७ जानेवारी, २०१४ रोजी भाप्रसे संवर्गाचे एकूण संवर्ग संख्याबळ ४४० इतके निश्चित करण्यासंदर्भातील प्रस्ताव केंद्र शासनास सादर केला होता, मात्र, केंद्र शासनाने (कार्मिक व प्रशिक्षण विभाग, नवी दिल्ली यांनी) दिनांक २१ मार्च, २०१४ च्या पत्रान्वये प्रत्येक राज्याने संवर्ग आढाव्याच्या अनुषंगाने भाप्रसे संवर्गातील संख्याबळ निश्चितीचा प्रस्ताव सादर करताना ५% पेक्षा अधिक वाढ प्रस्तावित करु नये, अशा प्रधानमंत्री कार्यालयाच्या सूचना असून त्यानुसार सुधारित प्रस्ताव सादर करण्याबाबत कळविले, तद्नुषंगाने राज्य शासनाने दिनांक १३ ऑगस्ट, २०१४ रोजी भाप्रसेचे एकूण संवर्ग संख्याबळ ३७० इतके निश्चित करण्याबाबतचा प्रस्ताव केंद्र शासनाकडे पाठविला होता, तथापि, केंद्र शासनाने दिनांक १६ फेब्रुवारी, २०१५ रोजीच्या अधिसूचनेन्वये राज्यातील भाप्रसे संवर्गाकरिता ३६१ इतके संख्याबळ मंजूर केले आहे,

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नागपूरच्या दिक्षाभूमीला "अ" वर्ग पर्यटनस्थळाचा दर्जा देण्याबाबत**

**(३०) १८२५५ (१२-०८-२०१५). श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूरच्या दिक्षाभूमीला "अ" वर्ग पर्यटनस्थळाचा दर्जा देण्याची लोकप्रतिनिधींनी माहे डिसेंबर २०१४ मध्ये वा त्यासुमारास शासनाकडे मागणी केलेली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त मागणीवर शासनामार्फत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०७-०९-२०१५) :** (१) होय.
(२) नागपूर येथील दीक्षाभूमी या ठिकाणास ब वर्ग पर्यटनस्थळ घोषित करण्याचा निर्णय शासनाने घेतला असून त्याबाबतचे आदेश दि. १४/८/२०१५ रोजी निर्गमित करण्यात आले आहेत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**दापोली तालुक्यातील (जि.रत्नागिरी) चंद्रनगर येथील रोशनी गोरिवले हिचा संशयास्पद मृत्यू झाल्याबाबत**

**(३१) १८४०४ (१०-०८-२०१५). श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दापोली तालुक्यातील (जि.रत्नागिरी) चंद्रनगर येथील रोशनी गोरिवले या १६ वर्षीय युवतीचा चार वर्षापूर्वी संशयास्पद मृत्यू झाला, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणी पोलिसांच्या तपासात अनेक त्रुटी राहिल्याने जनतेकडून आरोपींना मोकळे सोडल्याचा आरोप माध्यमांमधून होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणाच्या तपासात विलंब करणा-या पोलीस अधिका-यांची चौकशी करुन कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) असल्यास, मृत रोशनी गोरीवले हिच्या मारेक-यांचा शोध घेवून तिच्या कुटुंबियांना न्याय मिळवून देण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०५-०९-२०१५) :** (१) नाही.
(२) नाही.
(३) विलंब झालेला नाही.
(४) रोशनी गोरीवले हिने विहिरीमध्ये उडी मारुन आत्महत्या केल्याचे तक्रारीवरुन दापोली पोलीस ठाणे येथे अकस्मात मृत्यू रजि.क्र. २६/२०११, सी.आर.पी.सी. १७४ दाखल करण्यात आला.

पोलीस तपासामध्ये या प्रकरणी सदर तरुणीचे एका मुलाशी प्रेमसंबंध असल्याचे निष्पन्न झाले व या प्रेमसंबंधास तिच्या आईवडिलांचा विरोध असल्यामुळे तिने विहिरत उडी मारुन आत्महत्या केल्याचे उघड झाले आहे. उप विभागीय अधिकारी, दापोली यांच्याकडे विहीरीत उडी मारुन मृत्यू अशी समरी मंजूर झालेली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजे कापसाळ फणसवाडी (ता.चिपळूण, जि. रत्नागिरी) येथील मठाधिपतीने कामथे हुमणेवाडी येथून बालकाचे अपहरण केल्याबाबत**

**(३२) १८४९६ (१२-०८-२०१५). श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.सदानंद चव्हाण (चिपळूण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे कापसाळ फणसवाडी (ता.चिपळूण, जि. रत्नागिरी) मठाधिपती वासंती कांबळे हिने सहका-यासह कामथे हुमणेवाडी येथून बालकाचे अपहरण केल्याचे दिनांक १० मे, २००५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनांमार्फत चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार बालकाचे अपहरण करणा-यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०५-०९-२०१५) :** (१) होय.
(२) व (३) हुमणेवाडी येथील ७ वर्षाचा मुलगा दिनांक ०६ मे, २०१५ रोजी घराजवळ खेळत असतांना तो बेपत्ता झाल्याने त्याच्या वडीलांनी केलेल्या तक्रारीवरुन चिपळून पोलीस ठाणे येथे गु.र.क्र. ७३/२०१५, भा.दं.वि. कलम ३६३ प्रमाणे दिनांक ०७ मे, २०१५ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलीस चौकशीत श्रीमती वासंती कांबळी यांनी सदर मुलास फुस लावून पळवून नेले व आपल्या दैवी शक्तीच्या आधारे आपणच त्या मुलास परत आणून देऊ शकतो अशी भक्तजनांमध्ये अफवा पसरवली. असे निष्पन्न झाल्यामुळे सदर गुन्ह्यामध्ये भा.दं.वि. कलम ३४ व १२० (ब) महाराष्ट्र नरबळी आणि इतर अमानुष अनिष्ठ व अघोरी प्रथा तसेच जादूटोणा यांना प्रतिबंध घालण्याबाबत व त्याचे समुळ उच्चाटन करण्याबाबत अधिनियम २०१३ चे कलम ३(२)(३) ही वाढीव कलमे लावण्यात आली.

सदर प्रकरणी एकूण ६ आरोपीना अटक करण्यात आली असून गुन्हा पोलीस तपासावर प्रलंबित आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने परिक्षेच्या**
**निकषांबद्दल परिपत्रक प्रसिध्द केल्याबाबत**

**(३३) १९२४९ (१०-०८-२०१५). श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने दि. ८ एप्रिल २०१५ रोजी परिक्षेच्या निकषांबद्दल परिपत्रक प्रसिध्द केले पूर्व परिक्षेतून मुख्य परिक्षेसाठी पात्र ठरण्यास एकूण पदाच्या ८ पट उमेदवारच पूर्व परिक्षेतून निवडून मुख्य परिक्षेसाठी पात्र ठरविले जाणार आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, युपीएससीप्रमाणे एकूण पदाच्या १६ पट उमेदवार पूर्व परिक्षेतून मुख्य परिक्षेस पात्र ठरविले जावेत या मागणीसाठी दिनांक ५ मे, २०१५ रोजी विद्यार्थ्यांनी पुणे येथे जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढला होता, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, पूर्वपरिक्षेमध्ये एकूण पदांच्या १६ पट उमेदवार मुख्य परिक्षेसाठी पात्र ठरविण्याबाबत शासन स्तरावर कोणता निर्णय घेण्यात आला वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२४-०८-२०१५) :** (१) होय.

"महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत घेतल्या जाणाऱ्या पूर्व परीक्षेतून मुख्य परीक्षेला पात्र उमेदवार निवडताना प्रथम एकूण पदांच्या ८ पट उमेदवार निश्चित करावे व नंतर प्रत्येक प्रवर्गात १० पट उमेदवार घेण्यास्तव सीमारेषा खाली ओढावी" अशी सुधारणा आयोगाच्या कार्यनियमावली मध्ये दिनांक २७ मे, २०१३ रोजी केली आहे, सदर सुधारणेच्या अनुषंगाने आयोगाने दिनांक ८ एप्रिल, २०१५ रोजी वेबसाईटवर माहिती दिली आहे,

(२) होय, जिल्हाधिकारी, पुणे यांचे कार्यालयासमोर विद्यार्थ्यांनी दिनांक ५ मे, २०१५ रोजी मोर्चा काढला व जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन दिले,

(३) व (४) महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कार्यनियमावलीतील उपरोक्त सुधारणेबाबतची माहिती आयोगाने दिनांक ८ एप्रिल, २०१५ रोजी संकेतस्थळावर दिल्यानंतर त्यानुषंगाने तक्रारी प्राप्त झाल्याने त्यासंबंधीचा खुलासा आयोगाने दिनांक ६ मे, २०१५ रोजीच्या घोषणेत केला आहे, सदर पध्दतीनुसार पदसंख्येच्या सुमारे १२ ते १४ पट उमेदवार मुख्य परीक्षेस पात्र होतात.

---

**जळगांव पोलीस मुख्यालयाच्या मुख्य प्रवेशव्दारासमोर मारहाण केल्याची घटनेबाबत**

**(३४) १९९६५ (१०-०८-२०१५). श्री.गुलाबराव पाटील (जळगाव ग्रामीण), श्री.किशोर पाटील (पाचोरा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जळगांव पोलीस मुख्यालयाच्या मुख्य प्रवेशव्दारासमोर रिंकू तडवी (बक्कल क्रमांक ३०९७) या पोलीस कर्मचा-याने मद्यधुंद अवस्थेत पत्नी रुबिना हिला बेदम मारहाण केल्याची घटना नुकतीच माहे मे, २०१५ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी पा लीस अधिक्षकांकडे तक्रार करण्यास रुबिना गेली असताना तिला अधिका-यांना भेटू न देता तक्रार करण्यासाठी जिल्हा पेठ पोलीस ठाण्यात जाण्याचा सल्ला दिला, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने सखोल चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, तदनुसार शासन स्तरावर काय कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०७-०९-२०१५) :** (१), (२), (३) व (४) अशा प्रकाराची तक्रार अथवा गुन्हा जळगांव जिल्हा घटाकातील जिल्हा पेठ पोलीस स्टेशनला नोंद नाही.

---

**मुंबईतील उड्डाणपुलाखाली होणारे अनधिकृत पार्किंग बंद करण्याबाबत**

**(३५) २१३७५ (१०-०८-२०१५). श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील उड्डाणपुलाखाली होणारे अनधिकृत पार्किंग बंद करावे, असे आदेश न्यायालयाने दिले असतांनाही शहरातील अनेक उड्डान पुलाखाली मोठ्या प्रमाणावर अनधिकृतपणे पार्किंग सुरु आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, काही उड्डान पुलाखाली भिखारी व अंमलीपदार्थ सेवन करणारे व्यसनींनी आपले अड्डे तयार केले असून त्याठिकाणी घातपात होण्याची शक्यता आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने याबाबत चौकशी केली आहे काय, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व त्याअनुषंगाने अनधिकृत पार्किंग बंद करण्याबाबत कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०१-०९-२०१५) :** (१) होय.

(२) होय. तथापि, उड्डाणपुलाखाली असलेले भिकारी तसेच अंमली पदार्थ सेवन करणाऱ्यांविरुध्द वेळोवेळी पोलीसांकडून कारवाई करण्यात येते.

(३) मुंबई शहरातील महाराष्ट्र राज्य रस्ते विकास प्राधिकरण यांनी बांधलेल्या उड्डाणपुलाखाली होणारे पार्कींग सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातून बंद करण्याचा धोरणात्मक निर्णय तत्कालिन मा.

मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली दि. २७.६.२००८ रोजी झालेल्या बैठकीमध्ये घेण्यात आला आहे. त्या अनुषंगाने कार्यवाही करण्याच्या सूचना संबंधितांना देण्यात आलेल्या आहेत. महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने बांधलेल्या उड्डाणपुलाखालील जागा पे ॲण्ड पार्क तत्वावर कंत्राटदारांना देण्यात आल्या होत्या. त्या जागा ताब्यात घेण्यात आल्या असून त्यांचे सुशोभीकरण करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**अकोला शहरात चोरीच्या घटना घडत असल्याबाबत**

**(३६) २१४१९ (१०-०८-२०१५). श्री.गोवर्धन शर्मा (अकोला पश्चिम), डॉ.संजय कुटे (जळगाव जामोद) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अकोला शहरात एप्रिल, २०१५ या महिन्यात १५ चोरीच्या घटना झाल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, चोरट्यांना प्रतिबंधक घालण्यास पोलीसांना अपयश येत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) नसल्यास, उक्त प्रकरणी अकोला शहर पोलीसांनी काेणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३१-०८-२०१५) :**(१) अकोला शहरात माहे एप्रिल, २०१५ या महिन्यात एकूण ३१ चोरीच्या घटना घडल्या आहेत.
(२) नाही.
३१ चोरीच्या गुन्ह्यांपैकी ८ चोरीचे गुन्हे निदर्शनास आले असून या गुन्ह्यांमध्ये एकूण १४ आरोपीना अटक करण्यात आली आहे. अटक आरोपींकडून रु.२,३०,८३६/- ची मालमत्ता हस्तगत करण्यात आली आहे.
(३) चोरीच्या गुन्ह्यांना आळा घालण्यासाठी शहरातील ज्या भागांमध्ये चोरीचे प्रमाण जास्त आहे. अशा भागांमध्ये मालमत्तेविषयक गुन्हे घडु नये याकरीता दिवसा व रात्री एकूण १७ पोलीस पेट्रोलींग मोबाईल व्हॅन व २२ बिट मार्शल नेमण्यात आले आहेत. तसेच शहरातील शासकीय कार्यालये, निमशासकीय कार्यालये, व्यवसायिक क्षेत्र व खासगी निवासस्थानांमध्ये नियमितरीत्या वाहनांवरुन गस्त घालण्यात येते. शहरामध्ये नाकाबंदी, कोम्बीग ऑपरेशन तसेच वाहनांची तपासणी केली जाते.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**कोल्हापूर जिल्ह्यातील राधानगरी तालुक्यात दोन जणांचा तसेच कागलमध्ये एकाचा डॉल्बीच्या आवाजाने मृत्यु झाल्याबाबत**

**(३७) २१४९१ (१०-०८-२०१५). श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्ह्यातील राधानगरी तालुक्यात दोन जणांचा तर कागलमध्ये एकाचा डॉल्बीच्या आवाजाने मृत्यु झाल्याचे माहे मे, २०१५ च्या पहिल्या आठवड्यात निदर्शनास आले हे खरे आहे काय,

(२) असल्यास, डॉल्बीच्या आवाजावर नियंत्रण ठेवण्यासाठी तसेच उपरोक्त ठिकाणी डॉल्बीच्या आवाजाने मृत्यू झाल्याप्रकरणी आयोजकांवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(३) असल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०७-०९-२०१५) :**(१), (२) व (३)

सन २०१५ माहे जुलै, अखेर अश्या प्रकारचा गुन्हा अगर तक्रार कोल्हापूर जिल्ह्यात दाखल नाही.

---

**जळगांव शहरातील हॉटेल त्रिमुर्तीसमोर उभ्या असलेल्या कंटेनरमधून एलईडी टी.व्ही. चोरी झाल्याची घटना**

**(३८) २२९९८ (१०-०८-२०१५). श्री.चंद्रकांत सोनावणे (चोपडा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जळगांव शहरातील हॉटेल त्रिमुर्तीसमोर उभ्या असलेल्या कंटेनरमधून सुमारे रु. ९ लाख रुपयांच्या ९० एलईडी टी.व्ही. चोरी झाल्याची घटना दिनांक १४ एप्रिल, २०१५ रोजी घडली आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, एलईडी टी.व्ही. चोरीस जाऊन चार दिवस झाल्यावर सुध्दा पोलिसांनी गुन्हा दाखल केला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, गुन्हा दाखल करण्यासाठी टाळाटाळ करणा-या पोलिसांवर काय कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०९-०९-२०१५) :**(१) नमुद प्रकरणी रु. ८०, २६८/- किंमतीचे एकूण १२ दूरदर्शन संच चोरी गेलेले आहेत.

(२) व (३) चोरी गेलेल्या मालाची चौकशी करुन फिर्यादीने दि. २०/४/२०१५ रोजी दिलेल्या फिर्यादीनुसार लागलीच एम.आय.डी.सी. पोलीस स्टेशन जळगांव येथे गु.र.नं. ११०/१५ भा.दं.वि.कलम ३७९ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गुन्हा दाखल करण्यास पोलीसांकडून टाळाटाळ करण्यात आली नाही.

(४) विलंब झालेला नाही.

---

**अकोल्यामध्ये कौलखेड परिसरात भाड्याने खोली घेऊन आपण सीबीआयचा अधिकारी व आयकर अधिकारी असल्याचे सांगून लाखो रुपये उकळल्याबाबत**

**(३९) २३११३ (१०-०८-२०१५). श्री.हरिष पिंपळे (मुर्तिजापूर), डॉ.संजय रायमुलकर (मेहकर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला जिल्ह्यात सीबीआयचा मोठा अधिकारी भासवून व प्रेम जाळ्यात ओढून एका युवकाने एका तरुणीला ३ लाख रुपयांची फसवणुक केल्याचे नुकतेच उघडकीस आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या युवकाने अकोल्यामध्ये कौलखेड परिसरात भाड्याने खोली घेऊन आपण सीबीआयची अधिकारी व आयकर अधिकारी असल्याचे सांगून अनेक लोकांना नोकरीसाठी आमीष दाखवून लाखो रुपये उकळले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, काही तरुणींना लग्नाचे आमीष दाखवून त्यांच्या बरोबर लग्न करण्याचे आश्वासन देऊन अनेक तरुणींना फसवल्याचे सुध्दा उघडकीस आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत एका तरुणीने त्यांच्याविरुध्द खदान पोलीस ठाण्यात फसवणुकीची तक्रार दाखल केली आहे, हे खरे आहे काय,
(५) असल्यास, त्या तरुणाने अकोला न्यायालयात तरुणी व तिच्या कुटुंबियांनी ३ लाख रुपयांची खंडणी मागितली आणि अपहरण करुन डांबून ठेवल्याची तक्रार केली, हे ही खरे आहे काय,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०५-०९-२०१५) :**(१) या प्रकरणी अकोला येथील अभिलेखावर गुन्ह्याची नोंद नाही.
(२) या प्रकरणी पोलीस स्टेशन, खदान येथे कोणतीही तक्रार प्राप्त नाही.
(३) नाही.
(४) नाही.
(५) सदर प्रकरणी प्रथम श्रेणी न्यायदंडाधिकारी, अकोला येथे न्यायालयात तक्रार दिल्यावरुन पोलीस स्टेशन, खदान येथे गु.र.क्र.एम. ६०/१५, भा.दं.वि. कलम ३८४, ३४१,३४२,३८१,४२०,२९४,५०४,३४ अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

तसेच पोलीस स्टेशन, अमरावती शहर येथे दिलेल्या लेखी तक्रारीवरुन पंकज हेडवे यांच्याविरुध्द पोलीस स्टेशन, फ्रेजरपूरा येथे गु.र.क्र. १८८/२०१५, भा.दं.वि. कलम ४६८,४७१,४२० अन्वये गुन्हा करण्यात आला आहे.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## सोलापूर जिल्ह्यातील मोहोळ तालुक्यातील शेटफळ येथे सिध्देश्वर यात्रेत दोन गटात वाद निर्माण झाल्याबाबत

**(४०) २३१९२ (१०-०८-२०१५). श्री.रमेश कदम (मोहोळ) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर जिल्ह्यातील मोहोळ तालुक्यातील शेटफळ येथे दिनांक ८ एप्रिल, २०१५ रोजी सिध्देश्वर यात्रेत दोन गटात वाद निर्माण झाला होता, हे खरे आहे काय,

(२) मुंबईतील एका पोलीस उपनिरीक्षकाने स्वतःकडील बंदूक (रिव्हॉल्वर) काढून महिलांना केलेली शिवीगाळ व बंदूकीचा धाक दाखवून जीवे मारण्याची धमकी दिली, हे ही खरे आहे काय,

(३) या पोलीस उपनिरिक्षक यांच्या सांगण्यावरुन तेथील पोलीसांनी निरपराध लोकांच्याविरुध्द खोटे गुन्हे नोंदवून त्यांना अटक केली, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या निरपराध व्यक्तींवरील गुन्हे तात्काळ मागे घेण्यात यावे यासाठी तेथील नागरीकांनी व व्यापा-यांनी स्वयंस्फूर्त बंद पाडला असून या निरपराध व्यक्तीविरुध्द गुन्हे परत घेण्यात येत नाही तो पर्यंत मोर्चा व निदर्शने करण्याचा निर्णय घेतला आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, चौकशीनुसार पुढे कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,

(६) या निरपराध लोकांविरुध्दचे गुन्हे परत घेण्याबाबत भूमिका काय आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०९-०९-२०१५) :**(१) होय, प्रकरणी मोहोळ पोलीस ठाणे येथे गु.र.नं. १२७/१५ भा.दं.वि.कलम ३०७, ३२७, १४३, १४४, १४७, १४८,१४९ प्रमाणे, गु.र.नं. १२८/१५ भा.दं.वि.कलम ३२६, ३२७, ३५४, १४३, १४७, १४८, १४९, १२० ब प्रमाणे व गु.र.नं. १२९/१५ भा.दं.वि.कलम ३२४, ३२७, ३४१, १४९, १४८, ५०४ मु.पो.का. १३५ प्रमाणे असे ३ गुन्हे दाखल आहेत.

(२) हे खरे नाही.

(३) हे खरे नाही.

(४) हे खरे नाही, नमूद प्रकरणी नागरीकांनी व व्यापाऱ्यांनी बंद पाळला नाही. तसेच याबाबत कोणते ही निवेदन पोलीस ठाणेस प्राप्त नाही.

(५) होय,

(६) सदर गंभीर स्वरुपाच्या गुन्ह्यातील अटक आरोपीविरुध्द मा.न्यायालयात दोषारोप दाखल केले असून गुन्हा न्याय प्रविष्ठ आहे.

---

**बिच्छु टेकडी (अमरावती) परिसरातील विटभट्टी करीता लिजवर**
**दिलेली जागा परस्पर विकल्याबाबत**

**(४१) २४०६९ (१२-०८-२०१५). डॉ.सुनिल देशमुख (अमरावती), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती महानगरपालिका क्षेत्रातील नझुलचे मालकीचे विटाभट्टी करीता लिजवर दिलेली बिच्छु टेकडी परिसरातील जागा परस्पर लिज मालकाने विकल्याची बाब माहे मे २०१५ वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) तसेच या परीसरातील विटाभट्टीच्या जागेच्या वादातून दोन गटात हाणामारी होऊन त्यांची तक्रार फ्रेजरपुरा पोलीस स्टेशनला केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०४.०९.२०१५) :** (१) व (२) होय.
(३) अमरावती महानगरपालिका क्षेत्रातील नझुलचे मालकीचे विटभट्टी करीता लिजवर दिलेली बिच्छु टेकडी परिसरातील जागा देण्याबाबत लिजमालकाने संबंधितास तोंडी आश्वासन दिले होते. परंतु सदर जागा मिळवून देण्याबाबत व पैसे देण्याबाबत त्यांनी टाळाटाळ केल्यामुळे विटभट्टीच्या जागेच्या वादातून दोन गटांत वादावादी झाली.
त्यांनी एकमेकांविरुध्द फ्रेजरपूरा पोलीस स्टेशनमध्ये गुन्हे नोंदविले आहेत. गट क्र. १ यांच्याविरुध्द गु.र.क्र. १९९/२०१५, भा.दं.वि. कलम १४३,३२३ व गट क्र. २ विरुध्द गु.र.क्र. २००/२०१५, भा.दं.वि. कलम १४३, ३२३, २९४ अन्वये गुन्हे नोंदविण्यात आले. सदर प्रकरणी पाच आरोपींना अटक करण्यात आली असून सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशान्वये नोटीस देऊन आरोपांची मुक्तता करण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**जळगावमधील एका तरूणाला जीवे मारण्याची धमकी दिल्याबाबत**

**(४२) २५२७२ (१०-०८-२०१५). श्री.उन्मेश पाटील (चाळीसगाव) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जळगावमधील एका तरूणाला जीवे मारण्याची धमकी दिल्याने त्याला ठार मारण्याच्या तयारीत असलेला प्रशांत ऊर्फ मुन्ना संजय चौधरी, रा.पंढरीनाथनगर, भुसावळ या तरुणाला दिनांक ३० मे, २०१५ रोजी स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने पिस्तुल व एक जिवंत काडतूस सह अटक केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी सखोल चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीनुसार संबंधित गुन्हेगारावर पुढे कोणती कारवाई करण्यात आली आहे वा येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०९-०९-२०१५) :** (१) होय.
(२) गुन्ह्यातील पिस्तुल व जिवंत काडतुस बाळगणारा आरोपी व पिस्तुल व काडतुस विकनारा आरोपी अशा दोन्ही आरोपींविरुध्द भुसावळ बाजारपेठ पोलीस स्टेशन येथे गु.र.नं. ३०५३/१५ भारताचा हत्यार कायदा कलम ३/१५ प्रमाणे दि.३०/५/२०१५ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

गुन्ह्यात १ आरोपीस अटक करण्यात आली असून पिस्तुल विकनारा आरोपी फरार आहे. फरार आरोपीस लवकरात लवकर अटक करण्याचे प्रयत्न सुरु आहेत. गुन्ह्याचा तपास सुरु आहे.
(३) विलंब झालेला नाही.

---

**मॉसाहेब मीनाताई ठाकरे प्रसुतीगृहात सुविधांचा असलेला अभाव**

**(४३) २५३७३ (१४-०८-२०१५). श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मॉसाहेब मीनाताई ठाकरे प्रसुतीगृह, चुनाभट्टी, मुंबई या रुग्णालयात सोनेग्राफी मशीन व ऑपरेटर नसणे, औषधे उपलब्ध नसणे, डॉक्टर उपलब्ध नसणे, रुग्णांना पैष्टिक जेवण उपलब्ध नसणे, पिण्याच्या पाण्याची सोय, बेड स्वच्छ नसणे, एन.आई.सी.यु. उपलब्ध नसणे, सिजरियन व प्री. मेच्युअर्ड बेबी ट्रीटमेंट करिता उपकरण नसणे, एम्ब्युलन्सची सोय नसणे, डेंटीस चेअर व डॉक्टर उपलब्ध नसणे, अशा गैरसोयी असल्याने रुग्णांना अनेक गैरसोयीना सामोरे जावे लागते हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,
(३) चौकशीनुसार संबंधितांवर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१७-११-२०१५)** :(१) हे खरे नाही. मॉसाहेब मीनाताई ठाकरे, चुनाभट्टी , मुंबई हे रुग्णालय नसून माध्यमिक दर्जाचे २० खाटांचे प्रसुतीगृह आहे.
सदर प्रसुतीगृहात खालील सोयीसुविधा उपलब्ध आहेत.

- सदर प्रसुतीगृहात सोनोग्राफी मशीन उपलब्ध असून त्याचा नियमितपणे वापर होत आहे. त्याचप्रमाणे प्रसुतीगृहात डॉक्टर्स उपलब्ध असून औषधांचा साठा देखील पुरेशा प्रमाणात उपलब्ध आहे.
- सदर प्रसुतीगृहात रुग्णांसाठी पिण्याच्या पाण्याची सोय उपलब्ध आहे.
- सदर प्रसुतीगृहातील रुग्णांचे बेड नियमितपणे स्वच्छ केले जातात तसेच रुग्णांना थाळी पध्दतीने जेवन देण्यासंबंधीचा प्रस्ताव कार्यान्वित आहे.

- सदर प्रसुतीगृहासाठी राज्य शासनातर्फे एम.ई.एम.एस. अंतर्गत रुग्णवाहिका सेवा उपलब्ध आहे.
- सदर प्रसुतीगृहात सिझेरियन शस्त्रक्रीया व इतर शस्त्रक्रीया करण्याची सोय उपलब्ध आहे.
- सदर प्रसुतीगृह प्राथमिक दर्जाचे असल्याकारणाने तेथे एन.आय.सी.यु. व प्री.मॅच्युअर बेबी ट्रीटमेंट सुविधा उपलब्ध नाही.
- सदर प्रसुतीगृहाच्या आवारात दवाखाना असून तेथे डेनटल चेअर उपलब्ध करुन देण्याची कार्यवाही चालू आहे.

(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**आजरा तालुक्यातील (जि.कोल्हापूर) रामातिर्थ स्थळाला ब वर्ग पर्यटन स्थळाचा दर्जा देण्याबाबत**

**(४४) २५५३२ (१४-०८-२०१५). श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.रमेश कदम (मोहोळ) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आजरा तालुकयातील (जि.कोल्हापूर) रामातिर्थ स्थळाला ब वर्ग पर्यटन स्थळाचा दर्जा देण्याची मागणी मा.मुख्यमंत्री यांचेकडे चंदगडचे लोकप्रितनिधी यांनी पत्राद्‌वारे दिनांक १५ जून, २०१५ रोजी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०७-०९-२०१५) :** (१) होय.

(२) व (३) शासन निर्णय दि.१६/१/२०१२ अन्वये 'ब' वर्ग पर्यटनस्थळे निवड करुन शासनास शिफारस करण्याचे अधिकार जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखालील समितीस प्रदान करण्यात आलेले आहेत. त्यानुसार प्रश्नोक्त मागणी जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांना अभिप्रायार्थ पाठविण्यात आली आहे.

---

**महिला कामगारांना कारखान्यांमध्ये रात्रपाळी करता येण्यासाठी कारखाना अधिनियमामध्ये बदल करण्याबाबत**

**(४५) २५६२४ (११-०८-२०१५). श्री.महेश (दादा) लांडगे (भोसरी) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महिला कामगारांना कारखान्यांमध्ये रात्रपाळी करता यावी यासाठी कारखाना अधिनियम, १९४८ मध्ये बदल करण्याचा निर्णय शासनाने मे, २०१५ मध्ये वा त्या सुमारास घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, करखान्याच्या व्याख्येत बदल करून अनेक लघु उद्योगांना कारखाना अधिनियमातून वगळण्याचा निर्णय घेण्यात आला आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, कारखाना अधिनियमात मोठे बदल करण्याची कारणे काय आहेत,
(४) कारखाना कायद्यातुन वगळण्यात येणाऱ्या उद्योगांमधील कामगारांच्या सुरक्षेसाठी शासनाने काय उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश मेहता (०८-१०-२०१५) :** (१) होय,

दिनांक २० मे, २०१५ रोजी झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत कारखाने अधिनियम, १९४८ मध्ये सुधारणा करण्याचा निर्णय घेण्यात आला असून कलम ६६ (१) (ब) नुसार महिला कामगारांना सायंकाळी ७.०० ते सकाळी ६.०० या कालावधीत काम करण्यास असलेला प्रतिबंध शिथिल करणे, तसेच कलम २ (एम) या "कारखाना" या संज्ञेच्या व्याखेत सुधारणा कारणे या तरतुदींचा समावेश आहे.
(२) कलम २ (एम) या कारखाना या संज्ञेच्या व्याखेत सुधारणा करण्याच्या निर्णयामुळे छोट्या स्वरुपातील लघुउद्योगांना सुधारीत कायद्याच्या तरतुदी लागू होणार नाहीत.
(३) राज्यातील कामगारांचे हित जोपासणे आणि त्याबरोबरच उद्योगाला चालना देणे हा कारखाने अधिनियम, १९४८ मधील प्रस्तावित बदलाचा मुख्य उद्देश असून राज्यात उद्योगांमध्ये मोठ्या प्रमाणात वाढ होईल व बेरोजगारांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होऊ शकतील.
(४) सुरक्षिततेचे नियम न पाळणाऱ्या कारखान्यांविरुध्द कलम ८५ अन्वये कारवाई करण्याचे अधिकार शासनास आहेत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सांगली जिल्ह्यामध्ये संग्राम योजनेअंतर्गत युपीएस खरेदीतील गैरव्यवहाराबाबत

**(४६) २५६८० (१२-०८-२०१५). श्री.अनिल बाबर (खानापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सांगली जिल्ह्यामध्ये संग्राम योजनेअंतर्गत खरेदी करण्यात आलेल्या युपीएस मध्ये कमी क्षमतेच्या बॅटरी असल्याने सुमारे सात कोटी रुपयांचा गैरव्यवहार झाल्याचे जिल्हा पोलीस प्रमुख्य, सांगली यांना लेखी स्वरुपात तक्रार केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले, व त्या अनुषंगाने संबंधितांवर शासनाने कोणती कारवाई केली केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०९-०९-२०१५) :** (१) प्रकरणी उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत) जिल्हा परिषद सांगली यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन मे.ए. झेड इलेक्ट्रॉनीक्स कंपनी विरुध्द विश्रामबाग पोलीस ठाणे, सांगली येथे दिनांक ०८ मे, २०१५ रोजी गु.र.नं. ११०/२०१५ भा.दं.वि. कलम ४२०, ३४ प्रमाणे गुन्हा दाखल आहे.
(२) होय,
(३) दोन आरोपींनी संगनमत करुन मे. ए.झेड इलेक्ट्रॉनीक्स कंपनी तर्फे शासनाच्या संग्राम योजने अंतर्गत On line UPS With isolation transformer suitable for single phase AC input & single phase AC output floor mounted type-rating of UPS-१.० KVA indicative backup time ६० minutes (१६०० VAH) दर्जाचे UPS पुरवणे बाबत जिल्हा परिषद सांगलीकडून ऑर्डर परचेस केलेली होती. त्या प्रमाणे नमुद कंपनीने कमी क्षमतेचे यु.पी.एस. व बॅटरीचा पुरवठा करुन जिल्हा परिषद सांगलीची फसवणूक केल्याचे निष्पन्न झालेले आहे.

निष्पन्न आरोपींना न्यायालयातून अटकपुर्व जामीण मंजूर झाला आहे. गुन्हयाचा तपास चालू आहे.
(४) विलंब झालेला नाही.

---

## नांदेड येथे न्यायालयासाठी इमारत संकूल उभारणी करण्याबाबत

**(४७) २५९३४ (१२-०८-२०१५). श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नांदेड जिल्हयातील जिल्हा न्यायालय परिसरातील निजामकालीन १०० वर्षे जुनी असलेली इमारत कालबाहय होण्याच्या मार्गावर असून सध्या अस्तित्वात असलेली जागा न्यायालयाच्या कामकाजासाठी अपूरी पडत असल्याने माजी लोकप्रतिनिधी यांनी सदर इमारत संकूल बांधकामासाठी मा.मुख्यमंत्री यांना निवेदन दिले असल्याचे माहे मे, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या निवेदनानुसार शासनाने नांदेड येथे न्यायालयासाठी इमारत संकूल उभारणीकरीता कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०९-०९-२०१५) :** (१) नाही.
(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.
तथापि, नांदेड येथे न्यायसंकुल बांधण्याबाबतचा कोणताही प्रस्ताव मा.उच्च न्यायालयाकडून शासनाचा अद्याप प्राप्त झालेला नाही.

---

**पारशिवनी (जि.नागपूर) तालुक्यातील कोलितामार पर्यटनस्थळ घोषित करून परिसराच्या विकास करण्याबाबत**

**(४८) २६२१४ (१२-०८-२०१५). श्री.डि मल्लीकार्जून रेड्डी (रामटेक) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पारशिवनी (जि.नागपूर) तालुक्यातील आदिवासी क्षेत्रातील व घनदाट जंगलात वसलेले "कोलितामार" पर्यटनस्थळ घोषित करून परिसराच्या विकास करण्याची मागणी तेथील नागरिकांनी संबंधित अधिकाऱ्यांकडे वारंवार केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या निसर्गरम्य ठिकाणाला पर्यटन स्थळ म्हणून घोषित करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, ही हे खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रस्तावर शासनाने कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०७-०९-२०१५) :** (१) नाही.

(२), (३) व (४) प्रश्न भाग (१) मध्ये नमूद केलेल्या गावाचे नाव कोतामार नसून कोलितामार असे आहे. सदर ठिकाण पेंच व्याघ्र प्रकल्पांतर्गत येत असून पर्यटक पेंच व्याघ्र प्रकल्पाच्या संरक्षित क्षेत्रास भेट देतात. पर्यटकांच्या वास्तव्यासाठी जुने ४ संकुल उपलब्ध असून सन २०१४-१५ मध्ये पर्यटकांना थांबण्यासाठी ५ संकुलाची निर्मिती करण्यात आली आहे.

---

**मेट्रो स्थानकांवर "एमएसएफ" सुरक्षा रक्षकांना तैनात करण्याबाबत**

**(४९) २७०४९ (११-०८-२०१५). श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाच्या आदेशानुसार मेट्रो स्थानकांवर "एमएसएफ" सुरक्षा रक्षकांना तैनात करण्याचा निर्णय एमएमआरडीएद्वारे घेण्यात आला असल्याची बाब माहे मे, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, एमएमआरडीएद्वारे मेट्रोचे सुरक्षेवर कोटयावधी रुपयांचा खर्च केला जात असला तरी नफा मात्र मुंबई मेट्रो वन प्रा.लि. (एमएमओपीएल) च्या तिजोरीत जमा होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मेट्रोच्या सुरक्षिततेसाठी तोटा सहन करणा-या एमएमआरडीए ला एमएमओपीएल कडून नफ्याची काही रक्कम देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०७-११-२०१५) :**(१) होय.

(२) व (३) मुंबई मेट्रो वन प्रा.लि. मध्ये शासन प्राधिकरणाचा २६% सहभाग असून

त्याप्रमाणात नफा शासनास/ प्राधिकरणास मिळणार आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**वर्धा जिल्हयातील सिंधी रेल्वे फाटकाजवळ पत्रकार श्री. संदिप कोठारी यांचा अर्धवट जळालेला मृतदेह आढळल्याबाबत**

**(५०) २७४४१ (१२-०८-२०१५). श्री.प्रतापराव चिखलीकर (लोहा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वर्धा जिल्हयातील सिंधी रेल्वे फाटकाजवळ परसोडी रस्त्यावर मध्यप्रदेशातील बाळाघाट येथील पत्रकार श्री. संदिप कोठारी यांचा अर्धवट जळालेला मृतदेह टाकून दिल्याचे दिनांक १९ जून, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याप्रकरणाची पोलिसामार्फत चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व त्यानुसार कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०५-०९-२०१५) :** (१) होय.
(२) पोलीस स्टेशन सिंदी रेल्वे येथे मर्ग क्र. ११/१५, सी.आर.पी.सी. कलम १७४ अन्वये नोंद करण्यात आली आहे. सदर प्रकरणी चौकशीअंती मृताची ओळख पटली असून पोलीस स्टेशन कटंगी, जि.बालाघाट येथे गु.र.क्र. २६७/२०१५ भा.दं.वि. कलम ३६५ अन्वये गुन्हा दाखल झाल्याचे निष्पन्न झाले आहे. त्यानुसार करण्यात आलेल्या चौकशीचे संपूर्ण कागदपत्र पुढील तपासाकरिता पोलीस स्टेशन कटंगी यांना देण्यात आले असून या गुन्हयाचा पुढील तपास ते करत आहेत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव**
**महाराष्ट्र विधानसभा.**

---

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.